# पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,
# गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

## -: प्रेस नोट :- दिनांक:- ०५/०९/२०२६

**मुंबईमध्ये 'कोडेन फॉस्फेट मिश्रीत' कफ सिरपच्या बॉटल या अंमली पदार्थाची तस्करी करणारा पाहिजे आरोपी जेरबंद .**

| | |
|---|---|
| अं.प.वि., गु.र.क्र. व कलम | ६७/२०२६,<br>कलम-८(क) सह २१(क) एन.डी.पी.एस कायदा-१९८५ |
| अटक दिनांक | दिनांक-०३/०९/२०२६ रोजी २२.५० वा. |
| गुन्हयांचे घटनास्थळ | २ रा माळा, रूम नं.१५ च्या समोरील मोकळया जागी, मोची चाळ, ईजराईल मोहल्ला, मस्जिद बंदर रोड, पायधुनी, मुंबई-४००००९. |
| आरोपी संख्या | एकूण ०१ आरोपी |
| जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत | एकूण ३६७ 'कोडेन फॉस्फेट मिश्रीत' कफ सिरपच्या बॉटल<br>(अं.किं.०३,६७,०००/-) |

गुन्हे शाखेतील अं.प.वि.कक्षाचे आझाद मैदान युनिटचे पथकाने दिनांक-१७/०७/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई करताना ०१ इसमास संशयास्पद हालचालीं वरुन ताब्यात घेतले त्यांच्या घेतलेल्या झडतीमध्ये सदर इसम याच्याकडुन 'कोडेन फॉस्फेट मिश्रीत' कफ सिरपच्या एकुण १५७ बॉटल्स मिळुन आल्याने त्याच्या विरुध्द अं.प.वि.कक्ष, आझाद मैदान युनिटने गु.र.क्र.६७/२०२६, कलम-८(क) सह २१(क) एन.डी.पी. एस.कायदा-१९८५ अन्वये गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली होती.

अटक आरोपी हा पायधुनी व आसपासच्या परिसरात गेल्या काही कालावधीपासुन 'कोडेन फॉस्फेट मिश्रीत' कफ सिरपच्या बॉटल्सची तस्करी करीत असल्याचे तपासात निष्पन्न होते. अंमली पदार्थाची निर्मिती, वितरण आणि निर्मीतीसाठीची व्यवस्था करणे या दृष्टीकोनातुन गुन्हयाचा सखोल व तांत्रिक तपास करण्यात आला. सदर तपासाअंती नमूद गुन्ह्यातील पाहिजे आरोपीचा शोध घेण्यात यश आले. अटक करण्यात आलेल्या पाहिजे आरोपीच्या ताब्यातुन एकूण ३६७ 'कोडेन फॉस्फेट मिश्रीत' कफ सिरपच्या बॉटल्स पंचनाम्या अंतर्गत जप्त करून सदर इसमास अटक करण्यात आलेली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी ही श्री.देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री.अनिल कुंभारे, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), श्री. कृष्णकांत उपाध्याय, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्रीमती पोर्णिमा चौगुले- श्रींगी, पोलीस उप आयुक्त, अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई व श्री.सुधीर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई अंतर्गत आझाद मैदान युनिटचे प्र.पो.नि. श्री.शैलेश सुर्यवंशी यांचे नेतृत्वात स.पो.नि.प्रमोद आवळे, पो.उ.नि.राम लिंगे, पो.ह.पाटील, पो.ह.चव्हाण, पो.ह.प्रभु, पो.ह.ढोरे, पो.ह.करांडे, पो.शि.गोसावी, पो.शि.शिंदे, पो.शि.सिंह व पो.शि.चा.कांबळे यांनी केली आहे.

--------oo--------